# गटनेतेपदावरून वडेट्टीवारांची कोंडी

■ धानोरकरांसोबत मनोमिलन झाल्याने अडबालेंना पाठिंबा

■ अडूर राजीनामा देणार नसल्याची देशमुखांची भूमिका

लोकसत्ता वार्ताहर





**चंद्रपूर :** महापालिकेतील गटनेतेपदाच्या वादात काँग्रेस नेते, आमदार विजय वडेट्टीवार यांची चांगलीच कोंडी झाली आहे. विभागीय आयुक्तांच्या निर्णयामुळे राजेश अडूर यांचा गटनेतेपदावरील दावा कायम झालेला असताना, सुरेंद्र अडबालेच गटनेते राहतील आणि अडूर राजीनामा देतील, अशी भूमिका वडेट्टीवार यांनी नागपुरात मांडली. मात्र, अडूर यांच्या पाठीशी उभे असलेले ज्येष्ठ नगरसेवक वसंता देशमुख यांनी राजीनाम्याचा प्रश्नच उद्भवत नसल्याचे स्पष्ट करत वडेट्टीवार यांना अप्रत्यक्ष आव्हान दिले. नेत्यांचे मनोमिलन झाले म्हणून नगरसेवकांनी आपली भूमिका बदलायची काय, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

महापालिकेच्या राजकारणात सुरुवातीपासूनच वडेट्टीवार विरुद्ध खासदार प्रतिभा धानोरकर असा संघर्ष पाहायला मिळाला. महापौरपदाच्या निवडणुकीपासून गटनेतेपदापर्यंत प्रत्येक टप्प्यावर या संघर्षाचे पडसाद उमटले. वडेट्टीवार समर्थक अडूर यांची गटनेतेपदी निवड झाल्यानंतर त्यांना पदावरून दूर करण्यासाठी धानोरकर यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. अखेर जुलै महिन्यात अडूर यांना पदमुक्त करून त्यांच्या जागी धानोरकर समर्थक अडबाले यांची नियुक्ती करण्यात आली. या निर्णयाविरोधात अडूर आणि त्यांच्या समर्थक नगरसेवकांनी लढा सुरू ठेवला. अखेर विभागीय आयुक्तांनी अडूर यांच्या बाजूने निर्णय दिल्याने त्यांचे गटनेतेपद कायम झाले.

दरम्यानच्या काळात वडेट्टीवार आणि धानोरकर यांच्यात मनोमिलन झाले. यामुळे वडेट्टीवारांची भूमिका बदलली. आता अडबालेच गटनेते राहतील, असे ते सांगत आहेत. मात्र, देशमुख यांनी या भूमिकेला स्पष्ट विरोध केला आहे. नेत्यांच्या मनोमिलनापेक्षा नगरसेवकांची नाराजी वरचढ ठरणार का, असा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे. अडूर यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी 'कॅव्हेट' दाखल केले असल्याचे सांगितले.

> या प्रकरणात 'कॅव्हेट' दाखल केले असून, नेत्यांनी काहीही सांगितले तरी राजेश अडूर राजीनामा देणार नाहीत, तेच गटनेते राहतील. नेते कधी एकत्र येतात, तर कधी एकमेकांविरोधात भूमिका घेतात; मात्र महापालिकेतील राजकारण आम्ही पाहू.
> – **वसंता देशमुख,** ज्येष्ठ नगरसेवक.

# सरकारविरोधात आता 'दुष्काळ संघर्ष यात्रा'

## रविकांत तुपकर यांची घोषणा, शेतकऱ्यांचा एल्गार महामोर्चा

लोकसत्ता वार्ताहर



**बुलढाणा :** लाखो शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांकडे महायुती सरकारचे लक्ष वेधण्यासाठी शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी मोठ्या आंदोलनाची घोषणा केली. क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्यावतीने १४ नोव्हेंबरपासून बुलढाणा जिल्ह्यात सरकारविरोधात दुष्काळ संघर्ष यात्रा काढण्यात येणार असून, ४ डिसेंबरला शहरात 'एल्गार महामोर्चा' काढण्यात येणार आहे.

येत्या ७ डिसेंबरपासून नागपुरात सुरू होणाऱ्या विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या तीन दिवस आधी हा महामोर्चा होणार असल्याने शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सरकारचे लक्ष वेधण्याची मोठी तयारी संघटनेने सुरू केली आहे.

बुलढाण्यात कापसावरील शून्य आयात शुल्काच्या निर्णयाच्या अध्यादेशाची होळी करण्यात आली. कापसावरील आयात शुल्क ३० टक्क्यांपर्यंत वाढवावे, सोयापेंड आयात करू नये आणि शेतमालाला उत्पादन खर्चाच्या तुलनेत योग्य भाव द्यावा, अशा मागण्या करण्यात आल्या. यापाठोपाठ तुपकरांनी लगेचच प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली. पाच तास चाललेल्या या बैठकीत विचारविनिमयानंतर आगामी आंदोलनाची रणनीती निश्चित करण्यात आली.

### मलकापुरातून शंखनाद; गावागावांत मुक्काम

१४ नोव्हेंबरला मलकापूर येथून यात्रेला प्रारंभ होणार आहे. त्यानंतर नांदुरा, जळगाव जामोद, संग्रामपूर, शेगाव, खामगाव, मेहकर, लोणार, सिंदखेड राजा, देऊळगाव राजा आणि चिखली, या तालुक्यांतून ही यात्रा प्रवास करणार आहे. जिल्ह्यातील गावागावांत जाऊन शेतकऱ्यांशी थेट संवाद साधण्यात येणार आहे. गावातच मुक्काम, जाहीर सभा, पथनाट्य आणि जनजागृतीच्या माध्यमातून दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांचे प्रश्न मांडले जाणार आहेत. शेतकऱ्यांना प्रत्यक्ष किती नुकसान झाले, मदत किती मिळाली, कर्जवसुलीमुळे कोणत्या अडचणी निर्माण झाल्या, यासारख्या प्रश्नांवर चर्चा करून सरकारला जाब विचारला जाणार आहे.


## BAJAJ STEEL INDUSTRIES LIMITED

(CIN : L27100MH1961PLC011936)

Regd. Off. : Plot No. C-108, MIDC Industrial Area, Hingna, Nagpur - 440016 (MH) India.
Tel.: +91-07104-238101, Fax : 07104-237067;
Website : www.bajajngp.com, E-mail : cs_legal@bajajngp.com

**EXTRACT OF UNAUDITED CONSOLIDATED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER AND HALF YEAR ENDED SEPTEMBER 30, 2026**

(Rupees in Lakhs, except Earnings Per Share)

| | PARTICULARS | Quarter ended | | | Half Year ended | | Year ended |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 30/09/2026 | 30/06/2026 | 30/09/2025 | 30/09/2026 | 30/09/2025 | 31/03/2026 |
| | | Unaudited | | | Unaudited | | Audited |
| 1) | Total Income from Operations | 15,817.01 | 12,179.89 | 17,617.06 | 27,996.90 | 28,510.09 | 53,653.67 |
| 2) | Net Profit/(Loss) for the period before Exceptional Items | 887.86 | 87.60 | 2,827.59 | 975.47 | 3,820.42 | 5,000.30 |
| 3) | Exceptional Items - Profit/(Loss) | - | - | - | - | - | - |
| 4) | Net Profit/(Loss) for the period before tax | 887.86 | 87.60 | 2,827.59 | 975.47 | 3,820.42 | 5,000.30 |
| 5) | Net Profit/(Loss) for the period after tax | 769.96 | (26.87) | 2,127.53 | 743.10 | 2,867.45 | 3,690.50 |
| 6) | Total Comprehensive Income for the period (after tax) | 769.96 | (26.87) | 2,127.53 | 743.10 | 2,867.45 | 3,749.70 |
| 7) | Paid up Equity Share Capital (Face Value of Rs. 5/- Each) | 1,040.00 | 1,040.00 | 1,040.00 | 1,040.00 | 1,040.00 | 1,040.00 |
| 8) | Reserve Excluding Revaluation Reserve as per Balance Sheet of Previous Accounting Year | -- | -- | -- | -- | -- | 41,357.04 |
| 9) | Earning Per Share in Rupees face value of Rs 5/- Each (not annualised) Basic & Diluted | 3.70 | (0.13) | 10.23 | 3.57 | 13.79 | 18.03 |

NOTES :

(1) Key Numbers of Unaudited Standalone Financial Results for the Quarter and half year ended September 30, 2026 are as under: (Rupees in Lakhs)

| | PARTICULARS | Quarter ended | | | Half Year ended | | Year ended |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 30/09/2026 | 30/06/2026 | 30/09/2025 | 30/09/2026 | 30/09/2025 | 31/03/2026 |
| | | Unaudited | | | Unaudited | | Audited |
| 1) | Total Income from Operations | 14,753.88 | 10,877.31 | 15,172.23 | 25,631.18 | 24,589.87 | 48,604.14 |
| 2) | Exceptional Items - Profit/(Loss) | - | - | - | - | - | - |
| 3) | Net Profit/(Loss) for the period before Tax | 518.31 | (371.83) | 1,982.26 | 146.48 | 2,647.71 | 3,816.25 |
| 4) | Net Profit/(Loss) for the period after Tax | 481.45 | (371.83) | 1,481.68 | 109.62 | 1,979.65 | 2,757.59 |

1. The Results for the Quarter and half year ended September 30, 2026 have been reviewed by the Audit Committee and approved by the Board of Directors at their meeting held on November 06, 2026.
2. The above is an extract of the detailed format of the Financial Results filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing and Other Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the Quarterly Results are available on the Stock Exchange website (www.bseindia.com) and on the Company website (www.bajajngp.com).

PLACE : Nagpur
DATE : 06.11.2026

By Order of the Board
For **Bajaj Steel Industries Limited**
Sd/-
**Rohit Bajaj**
**Chairman & Managing Director**
**DIN : 00511745**


# गुरुदेव सेवकांचे आत्मक्लेश आंदोलन

## गुरुकुंज मोझरीत महासमाधीसमोर सात तास ठिय्या

**अमरावती :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या श्रीक्षेत्र गुरुकुंज मोझरी येथील ५८ व्या पुण्यतिथी महोत्सवात सादर करण्यात आलेल्या निवेदनात तरुणांच्या आंदोलनांचा उल्लेख 'अराजकता' असा करण्यात आल्याच्या निषेधार्थ शुक्रवारी सकाळी ११ वाजल्यापासून शेकडो गुरुदेव सेवकांनी राष्ट्रसंतांच्या महासमाधीस्थळी तब्बल सात तास ठिय्या मांडत 'आत्मक्लेश' आंदोलन केले. दिवाळीनंतर तरुणांशी संयुक्त बैठक घेऊन तोडगा काढण्याचे आश्वासन गुरुदेव सेवा मंडळाने दिल्यानंतर हे आंदोलन तूर्तास स्थगित करण्यात आले; मात्र मागण्या मान्य न झाल्यास पुन्हा तीव्र संघर्ष उभारण्याचा इशारा आंदोलकांनी दिला आहे.

पुण्यतिथी महोत्सवातील श्रद्धांजलीपर निवेदनात राष्ट्रसंतांच्या जीवनकार्याचा आणि विचारांचा आढावा घेणे अपेक्षित होते. परंतु, जागतिक व देशांतर्गत घडामोडींचा संदर्भ देताना तरुणांच्या न्याय्य हक्कांसाठी झालेल्या आंदोलनांना 'अराजक' संबोधण्यात आले. तसेच संविधानातील धर्मनिरपेक्षता, सर्वधर्मसमभाव आणि मानवतावाद या मूल्यांविषयी वादग्रस्त विधाने करण्यात आल्याचा आरोप गुरुदेव सेवकांनी केला.

या आंदोलनात माजी आमदार अमोल मिटकरी, लेखक चंद्रकांत वानखडे, किशोर बळी, ज्ञानेश्वर रक्षक, प्रेमकुमार बोके, डॉ. रघुनाथ वाडेकर, प्रशांत कांबळे, रवी मानव, रूपराव वाघ, वैभव वानखडे, अंकुश वाघ, शफीक शहा, ज्ञानेश वाकुडकर, गणेश हलकारे, पंकज वंजारे, रोशन कांडलकर, गोविंद पोलाड, हेमंत टाले, डॉ. नरेंद्र तराळ, सीमा बोके यांच्यासह शेकडो गुरुदेव सेवक सहभागी झाले होते.

### प्रवेशद्वारावर अडवणूक

समाधीस्थळावर कोणत्याही पक्षाचे अथवा राजकीय आंदोलन करण्यास परवानगी नाही, अशी भूमिका घेत पोलिसांनी आंदोलकांना अटकाव केला. प्रशासनाच्या या भूमिकेमुळे संतप्त झालेल्या गुरुदेव सेवकांनी थेट मुख्य प्रवेशद्वारासमोरील रस्त्यावरच सुमारे दोन तास बसून आत्मक्लेश आंदोलन सुरु ठेवले. अखेर वाढता तणाव पाहून आंदोलकांना महासमाधी परिसरात प्रवेश देण्यात आला.

### 'गुरुदेव सेवा मंडळाने लेखी माफी मागावी'

श्रद्धांजलीपूर्वी वाचण्यात आलेल्या निवेदनाची मूळ प्रत तत्काळ जाहीर करावी तसेच पुढील वर्षांपासून अशी निवेदने अधिकृतपणे अनुयायांसाठी खुली करावीत, पुण्यतिथी महोत्सवातील निवेदनात केवळ राष्ट्रसंतांच्या जीवनपटावरच भर असावा, परीक्षांमधील पेपरफुटी व वाढत्या आत्महत्यांविरोधात आवाज उठवणाऱ्या तरुणांच्या आंदोलनाला 'अराजक' म्हटल्याबद्दल गुरुदेव सेवा मंडळाने लेखी माफी मागावी, अशा मागण्या यावेळी करण्यात आल्या.

# पालकमंत्री कार्यालयात शेतकऱ्यांचा ठिय्या

## 'क्रांतिकारी शेतकरी संघटना' नुकसानभरपाईसाठी आक्रमक

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**अमरावती :** खरीप हंगाम २०२६ मध्ये बनावट व निकृष्ट दर्जाच्या सोयाबीन बियाण्यांमुळे झालेल्या नुकसानीपोटी प्रतिहेक्टरी एक लाख रुपयांची मदत देण्याकडे शासनाने दुर्लक्ष केल्याचा आरोप करत शुक्रवारी क्रांतिकारी शेतकरी संघटनेने पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या कार्यालयात जोरदार ठिय्या आंदोलन केले. प्रशासनाने अखेर १५ दिवसांत पालकमंत्री व कृषिमंत्र्यांसमवेत बैठक आयोजित करण्याचे लेखी आश्वासन दिल्यानंतर हे आंदोलन मागे घेण्यात आले.

विदर्भात यंदाच्या खरीप हंगामात मोठ्या प्रमाणावर निकृष्ट सोयाबीन बियाण्यांचा पुरवठा झाल्याने उत्पादनात मोठी घट होऊन शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. या पार्श्वभूमीवर संघटनेने १७ जुलैला बावनकुळे यांना निवेदन सादर करून हेक्टरी एक लाख रुपयांच्या भरपाईची मागणी केली होती. मात्र, प्रशासनाकडून कोणतीही दखल न घेतल्याने संघटनेने स्मरणपत्र देत ६ नोव्हेंबरपर्यंतची मुदत दिली होती. ही मुदत संपताच शुक्रवारी संघटनेचे विदर्भ संपर्कप्रमुख अमित अढाऊ यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांनी थेट पालकमंत्री कार्यालयावर धडक दिली.

मागणी मान्य झाल्याशिवाय जागेवरून हलणार नाही, असा आक्रमक पवित्रा आंदोलकांनी घेतल्याने महसूल यंत्रणेची धावपळ उडाली. अखेर निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत आंदोलकांशी चर्चा केली. आगामी १५ दिवसांत शासन पातळीवर पालकमंत्री व कृषिमंत्री यांच्या उपस्थितीत संयुक्त बैठक घेऊन तोडगा काढण्याचे लेखी आश्वासन प्रशासनाने दिल्यानंतर हे आंदोलन स्थगित करण्यात आले.

आंदोलनात राजू मुळे, कुंदन काळे, अनिल पवार, नंदकिशोर शेरे, स्वप्नील भुयार, प्रशांत शिरभाते, दिनेश आमले, प्रफुल्ल उमरकर, गजानन चौधरी, लखन मोहोड यांच्यासह शेतकरी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.


## सेन्ट्रल बैंक ऑफ़ इंडिया Central Bank of India

क्षेत्रिय कार्यालय अमरावती : पहिला मजला,प्लॅटिनम एम्पायर बिल्डींग,तिवसा जिनीग जवळ,अमरावती-444601

### मागणी सुचना

सदर प्राधिकृत अधिकारी यांनी सरफेसी अधिनियम, 2002 च्या कलम 13(2) अंतर्गत खाली नमूद केलेल्या कर्जदारांना 60 दिवसांच्या आत थकबाकी रकमेची परतफेड करण्यासाठी सूचना जारी केली होती, सदर सूचना अपुरे पत्ते/ न स्वीकारल्यामुळे परत प्राप्त झाली आहे. त्यामुळे सरफेसी अधिनियम, 2002 नुसार खाली नमूद केलेल्या कर्जदारांना माहितीसाठी ही सूचना प्रकाशित करण्यात येत आहे.

| अ. क्र. | शाखा | कर्जदाराचे/सह-कर्जदाराचे नाव आणि पत्ता | आकारलेल्या मालमत्तेचा तपशील | थकित दिनांक | मागणी नोटीसची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1) | शाखा : अमरावती मुख्य (0699) | **कर्जदार : श्री प्रगती केशव वैद्य** तर्फे बी.एस.डोईफोडे, केडीयानगर,राजापेठ हनुमान मंदीर जवळ, अमरावती तह.आणि जि.अमरावती-444606 **जमानतदार : 1) श्री गुणवंत बापूराव डोईफोडे** तर्फे बी.एस.डोईफोडे, केडीयानगर,राजापेठ हनुमान मंदीर जवळ, अमरावती तह.आणि जि.अमरावती-444606 **2) श्री नरेशचंद्र मधुकर पाटील** पंजाबराव देशमूख कॉलोनी, नवसारी व्हीएमव्ही रोड, अमरावती-444604 **3) श्री सतीश दिंगाबरराव कडू** प्लॉट नं.18,दत्तकृपा कॉलोनीमारडी रोड,अमरावती **4) श्री योगेश प्रकाशराव शेळके** मोहननगर, रेखा कॉलोनी जवळ व्हीएमव्ही रोड,अमरावती-444604 | **संपत्ती मालकाचे नाव : श्री गुणवंत बापूराव डोईफोडे** आरएमनं.सीएनआर-3-2014 दि.10/02/2014 आणि तारण ठेवलेली मालमत्तेचे वर्णन खालीलप्रमाणे. **तारण ठेवलेली मालमत्ता 1:** प्लॉट नं.16, भाग 1, गाव नं.87, जागा सर्व्हे नं.4, मौजा चांदूर रेल्वे, प्रांगणे- मांजरखेड कसबा क्षेत्रफळ 1775.40 चौ.फीट, तह.चांदूर रेल्वे, जि.अमरावती नगर परिषद चांदूर रेल्वेच्या क्षेत्रामध्ये. चर्तुःसिमा : पुर्वेस-प्लॉट नं.15,पश्चिमेस-प्लॉट नं.17, उत्तरेस-रोड, दक्षिणेस-प्लॉट नं.39 **तारण ठेवलेली मालमत्ता 2:** प्लॉट नं.19, भाग 1, गाव नं.87, जागा सर्व्हे नं.4, मौजा चांदूर रेल्वे, प्रांगणे- मांजरखेड कसबा क्षेत्रफळ 1775.40 चौ.फीट, तह.चांदूर रेल्वे, जि.अमरावती नगर परिषद चांदूर रेल्वेच्या क्षेत्रामध्ये. चर्तुःसिमा : पुर्वेस-प्लॉट नं.18,पश्चिमेस-प्लॉट नं.20, उत्तरेस-रोड, दक्षिणेस-प्लॉट नं.36 **तारण ठेवलेली मालमत्ता 3:** प्लॉट नं.20, भाग 1, गाव नं.87, जागा सर्व्हे नं.4, मौजा चांदूर रेल्वे, प्रांगणे- मांजरखेड कसबा क्षेत्रफळ 1775.40 चौ.फीट, तह.चांदूर रेल्वे, जि.अमरावती नगर परिषद चांदूर रेल्वेच्या क्षेत्रामध्ये. चर्तुःसिमा : पुर्वेस-प्लॉट नं.19,पश्चिमेस-प्लॉट नं.21, उत्तरेस-रोड, दक्षिणेस-प्लॉट नं.35 | 28/09/2024 | रु. 37,88,336.38 (रुपये सदतीस लाख अंठयाशी हजार तीनशे छत्तीस आणि पैसे अडतीस फक्त) 05/11/2026 पर्यंत |

की, वर नमूद कर्जदार या जाहीर सूचनेच्या माध्यमातून सूचित करण्यात येते की सदर सूचना प्रकाशित होण्याच्या दिनांकापासून 60 दिवसांचे आत बँकेचे समाधान होईल अशा पध्दतीने वर नमूद थकबाकी रकमेचा भरणा करण्यात न आल्यास प्राधिकृत अधिकारी सरफेसी अधिनियम, 2002 मधील तरतुदी अंतर्गत वर नमूद मालमत्तेचा ताबा घेतील आणि पुढे तारण मालमत्तेचा लिलाव करतील आणि बँकेकडे उपलब्ध असलेल्या इतर कायदेशीर कारवाया/उपायसुध्दा करु शकतील. अनुच्छेद 13(13) अंतर्गत सदर कर्जदार वर नमूद तारण मालमत्तेचा विक्री, भाडेपट्टी किंवा इतर कोणत्याही पध्दतीने हस्तांतरण करण्यास/तिची विल्हेवाट लावण्यास सुध्दा प्रतिबंध करण्यात येत आहे.

वर नमूद कर्जदार कोणत्याही कामकाजाच्या दिवशी वैध पावती दाखवून निम्न स्वाक्षरीकारांकडून सरफेसी अधिनियम 2002, मधील अनुच्छेद 13(2) अंतर्गत जारी करण्यात आलेली मूळ सूचना सुध्दा प्राप्त करु शकतात.

स्थळःअमरावती दिनांक : 05.11.2026 (मजकुरात वादाच्या स्थितीत इंग्रजी मजकूर ग्राहय मानावा.) प्राधिकृत अधिकारी,सेन्ट्रल बैंक ऑफ इंडिया



## वास्तू हाऊसिंग फायनान्स कॉर्पोरेशन लि.

VASTU HOUSING FINANCE

युनिट 203 आणि 204, 2रा मजला, "ए" विंग, नवभारत इस्टेट, झकेरिया बंदर रोड, शिवडी (पश्चिम), मुंबई 400015. महाराष्ट्र.
सीआयएन क्र.: यू65922एमएच2005पीएलसी272501

### ताबा सूचना

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार हे वास्तु हाऊसिंग फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड यांचा अधिकृत अधिकारी असल्याने त्यांनी सिक्युरिटायजेशन अँण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अँसेट्स अँण्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अँक्ट, 2002 अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम 2002 च्या नियम 3 सहवाचता निर्देशित कलम 13 (12) अंतर्गत त्यांना देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, खाली नमूद केलेल्या कर्जदारांना संबंधित नोटीसमध्ये नमूद केलेली रक्कम नोटीस मिळाल्याच्या तारखेपासून 60 दिवसांच्या आत परत करण्याचे आवाहन करणारी मागणी सूचना जारी केली. कर्जदार रक्कम परत करण्यात अयशस्वी झाल्यामुळे, निम्नस्वाक्षरीकार यांनी निर्देशित नियमांच्या नियम 8 सहवाचता वरील निर्देशित कायद्याच्या कलम 13(4) अंतर्गत मला दिलेल्या अधिकारांचा वापर करून खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा खाली नमूद केलेल्या तारखेला ताबा घेतला आहे.

कर्जदार आणि जामीनदार, विशेषतः, आणि सर्वसाधारणपणे जनतेला याद्वारे सावध करण्यात येते की त्यांनी मालमत्तेशी व्यवहार करू नये आणि मालमत्तेशी संबंधित कोणतेही व्यवहार हा खाली नमूद केलेल्या रकमेसाठी आणि त्यावरील व्याज, खर्च इत्यादींसाठी वास्तु हाऊसिंग फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड शाखा यांच्या शुल्काच्या विषयाधीन असेल.

| अ. क्र. | कर्जदार, सह-कर्जदाराचे नाव आणि एलएएन क्र. | मागणी सूचनेची तारीख आणि रक्कम | मालमत्तेचे वर्णन | ताब्याची तारीख आणि प्रकार |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री/श्रीमती शुभम नरेश इंगोले (कर्जदार), श्री/श्रीमती वंदना नरेश इंगोले (सह-कर्जदार), श्री/श्रीमती गौरव नरेश इंगोले (सह-कर्जदार), श्री/श्रीमती सौरभ नरेश इंगोले (सह-कर्जदार) एलपी0000000191315 | दि. 17-ऑगस्ट-26 रु. 12,90,401/- दि. 17-ऑगस्ट-26 रोजीनुसार | धारण जमीन प्लॉट क्र. 72, एकूण मोजमापे क्षेत्रफळ 106.87 चौ. मी. (1150.34 चौ. फूट) (बिल्ट अप क्षेत्रफळ 1,560 चौ. फूट) संपूर्ण जमिनीचा एक भाग असल्याने, धारण केएच. क्र. 8, पी.एच.क्र. 39, मौजा क्र. 436, ठाक क्र. 171, मौजा - हरपूर, शहर सर्वेक्षण क्र. 765, कॉर्पोरेशन हाऊस क्र. 2872, वॉर्ड क्र. 20 यामध्ये, तहसील आणि जिल्हा - नागपूर - 440024 यांचे ते सर्व तुकडे आणि पार्सल, खालीलप्रमाणे सीमाबद्धः-उत्तर- प्लॉट नं. 73, दक्षिण-रस्ता, पूर्व- श्री. कैथे यांचे घर, पश्चिम- प्लॉट क्र. 71. | दि. 02-नोव्हेंबर-26 रोजी प्रतिकात्मक ताबा घेण्यात आला. |

दिनांकः 07.11.2026
ठिकाणः नागपूर

अधिकृत अधिकारी
वास्तु हाऊसिंग फायनान्स कॉर्पोरेशन लि.


## चोपण येथे चारा डेपो उभारणीसाठी १३.७१ लाखांची तरतूद

**वर्धा :** कारंजा (घाडगे) तालुक्यातील चोपण येथे चारा डेपो उभारण्यासाठी शासनाकडून १३ लाख ७१ हजार ९६२ रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली असून, या कामाची निविदाही प्रसिद्ध करण्यात आली आहे. वर्धा लोकसभा मतदारसंघाचे खासदार अमर काळे यांच्या पाठपुराव्याला यश आले आहे.चोपण परिसरात चारा डेपो उभारण्यात यावा, अशी मागणी स्थानिक शेतकरी व नागरिकांनी खासदार काळे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली होती. पशुधनाचे संगोपन आणि चाऱ्याची उपलब्धता यांसारख्या महत्त्वाच्या समस्या लक्षात घेऊन खासदारांनी या प्रश्नाचा शासनस्तरावर सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या या प्रयत्नांमुळे निधी उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा झाला.


## बैंक ऑफ़ बड़ौदा Bank of Baroda

## क्षेत्रिय कार्यालय दबावग्रस्त अस्ति वसूली शाखा, अमरावती

C/O M.I.D.C. शाखा प्लॉट क्रमांक 39 "सूर्या",फरशी स्टॉप रोड, दस्तूर नगर, अमरावती (महा.), 444606

### जंगम/ स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी विक्री सूचना "परिशिष्ट-IV-A [नियम 8 (6) आणि 6(2) ची तरतूद पहा]

**सिक्यूरिटी इंटरेस्ट (ईन्फोर्समेंट) रुल्स 2002 च्या नियम 8 (6) आणि 6(2) च्या तरतुदीसह सिक्युरिटायझेशन अँन्ड रिकंस्ट्रक्शन ऑफ फाइनैंशियल अँसेटस अँन्ड ईन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ऍक्ट 2002 च्या अंतर्गत जंगम/ स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना .**

याद्वारे सामान्यत: जनतेला आणि विशेषत: कर्जदार, गहाणदार आणि जामीनदारांना नोटीस दिली जाते की खाली वर्णन केलेली जंगम/ स्थावर मालमत्ता सुरक्षित कर्जदाराकडे गहाण/आकारणी केली आहे, ज्याचा ताबा कर्जदाराने घेतला आहे. बँक ऑफ बडोदाचे अधिकृत अधिकारी, सुरक्षित कर्जदार, खाली नमूद केलेल्या खात्यांतील थकबाकी वसूल करण्यासाठी **"जसे आहे तेथे", "जसे आहे तसे", आणि "जे काही आहे"** या आधारावर विकले जातील. कर्जदार/s/गहाणदार/जमीनदार/s/सुरक्षित मालमत्ता/s/देय/राखीव किंमत/ई-लिलावाची तारीख आणि वेळ, ईएमडी आणि बोली वाढीची रक्कम यांचे तपशील खाली नमूद केले आहेत.

| अनु./ लॉट क्र. | कर्जदार/जमानतदार/ गहाणदार यांचे नाव आणि पत्ता | जंगम/ स्थावर मालमत्तेचे वर्णन (गहाणदार) | 13(2) सूचनेनुसार एकूण देय रुपयांमध्ये | 1. राखीव किंमत 2. अर्नेस्ट मनी डिपॉझिट (ईएमडी) 3. बिड वाढीव रक्कम | ई-लिलावाची तारीख ई लिलावाची वेळ - प्रारंभ वेळ ते समाप्ती वेळ | ताब्यात घेण्याची स्थिती (सांकेतिक / वास्तविक) | मालमत्ता तपासणी तारीख आणि वेळ. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 1) **श्री. शशिकांत महेंद्रकुमार दवे (कर्जदार) आणि** 2) **श्रीमती रंजना दवे (सह-कर्जदार)** C/o. वामनराव मालपे, एल.आय. सी. कॉलनी, यादव गॅस एजन्सी जवळ, मोती नगर, रुक्मिणी नगर, अमरावती - 444606. **तसेच दोन्ही राहणार :** फ्लॅट नं. 501, अर्जुन एम्पायर, मणिपूर लेआउट, मणिपूर गोडाऊनजवळ, मेंढारा कॉलनी रोड, अमरावती - 444603. | सर्व भाग आणि तुकडा असलेले **फ्लॅट नं. 501 (3बीएचके)**, ज्याचे समावेश कारपेट क्षेत्रफळ एरीया 77.81 चौ.मी. बिल्टअप क्षेत्रफळ एरीया 106.14 चौ.मी. आणि सुपर बिल्ट अप क्षेत्रफळ एरीया 123.43 चौ.मी. त्यासह जमिनीतील 8.72% समानुपातिक अविभाजीत हिस्सा असलेले बिल्डींच्या पाचव्या मजलीवर स्थित बिल्डींग "अर्जुन एम्पायर ज्योती" नावानी परिचीत प्लॉट नं. 3 वरील बांधकामासह असलेले क्षेत्रफळ एरीया 5207 चौ.फुट (483.75 चौ.मी.) त्यासह अमरावती जिल्हाधिकारी यांच्या महसूल प्रकरण क्र. N A P - 34/TARKHEDA-125/2009-2010 अन्वये दिनांक 13/05/2010 रोजी पारित आदेशान्वये बिगरशेती प्रयोजनार्थ रुपांतरित करण्यात आले असुन ज्यापैकी असलेले शेत सर्व्हे नं. 31, मौजा तारखेडा, प्रगणे बडनेरा, तहसिल अणि जिल्हा अमरावती जी दुय्यम निबंधक, अमरावती शहर यांच्या कार्यक्षेत्राच्या हद्दीत स्थित. **सदर मिळकतीच्या चर्तुसिमा विक्रीखताप्रमाणे खालीलप्रमाणे : पूर्वेस:** मुख्य रोड, **पश्चिमेस:** फ्लॅट नं. 502, **उत्तरेस:** मोकळी जागा व त्यापुढे गुप्ता यांचे शेत, **दक्षिणेस:** मोकळी जागा व त्यापुढे इतरांची अपार्टमेंट. **गहाणदार: श्री. शशिकांत महेंद्रकुमार दवे आणि श्रीमती रंजना दवे** | रु. 43,93,739/- + लागु न झालेले व्याज आणि इतर शुल्क | 1. रु. 40,50,000/- 2. रु. 4,05,000/- 3. रु. 10,000/- | 10/12/2026 रोजी 14:00:00 ते 18:00:00 वा. पर्यंत प्रत्येक वाढीव बोलीवर 18:00:00 नंतर वेळ 10 मिनिटांनी वाढवला जाईल | वास्तविक | 04/12/2026 रोजी 10:00:00 ते 17:00:00 वा. पर्यंत |

विक्रीच्या तपशीलवार अटी व शर्तीसाठी, कृपया https://www.bankofbaroda.in/e-auction.html आणि ऑनलाईन ऑक्शन पोर्टल https://baanknet.com या वेबसाइट लिंकला पहा/भेट द्या. तसेच, संभाव्य बोलीदार अधिकृत अधिकाऱ्याशी दूरध्वनी क्रमांक / मोबाईल क्रमांक 9301828296/ 7028680735 वर संपर्क साधू शकतात.

येथे स्कॅन करा तपशीलवार अटी आणि शर्तीसाठी.

**दिनांक : 07/11/2026**
**स्थळ : अमरावती**

(इंग्रजीतील मूळ मजकूर ग्राह्य धरण्यात येईल)

**अधिकृत अधिकारी बँक ऑफ बडोदा**



## लोकसत्ता क्लासिफाइडस्

सगळ्यांकरिता सर्वकाही

### शैक्षणिक विशेष

### शैक्षणिक

**डाऊझिंग व वास्तुदोष जागतिक दर्जाची कार्यशाळा, स्कूल ऑफ इंडियन डाऊझर्स अँन्ड जिओमन्सीतर्फे ऑनलाईन झूमवर, बॅच २१८, १५ व २२ नोव्हेंबर, दोन रविवारी, प्रॅक्टिकल वर्कशॉप, सकाळी ९.३० ते २ वाजेपर्यंत. रजिस्ट्रेशन कॉल व बँक पेमेंट मोबाईलवरून करा. किट घरपोच. लेचर अँन्टेना कॉस्मिक एनर्जी २ दिवसीय जागतिक दर्जाचे ट्रेनिंग, २८ वी बॅच, १२ व १३ डिसेंबर पूर्ण दिवस दादर, मुंबईत, साईट व्हिजीटसह दोन्ही वर्कशॉपमध्ये वास्तुउर्जा, भूमि परिक्षण व दोष, आरोग्य व हिलिंग, जिओपॅथिक स्ट्रेस, हानीकारक पाणी, विस्तृत उच्च अभ्यासक्रम. https://www.indiandowsers.org वेबसाईटवर शेकडो फोटो व अभिप्राय. Youtube channel : Dowser's Diary वर चार व्हिडीओज. संपर्क प्रो. रवि वैद्य सर, प्रिन्सिपल डाऊझर, मोबाईल 9821349038/ 9821380289.**

0071070037-2




### महत्त्वपूर्ण निवेदन

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींचा मजकूर (अँडव्हर्टाइजिंग कॉपी) स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची (कन्टेन्ट) पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी, आपल्या वृत्तपत्रांमध्ये अथवा प्रकाशनांमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तींबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान वा हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी द इंडियन एक्स्प्रेस (प्रा.) लिमिटेडला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे वाचकांना आम्ही असा सल्ला देतो की, जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्यांच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी त्यांनी आवश्यक ती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.